## चित्रपट - आई मला क्षमा कर

फिल्मिस्तानमध्येच आठवले यांच्या एका सहकार्याने दिग्दर्शित केलेल्या आई मला क्षमा कर' या चित्रासाठी त्यांनी गीते लिहिली आणि त्यात एक ख्रिश्चन पाद्र्याची भूमिकाही केली. राम कदम यांचेच संगीत होते. त्यातील सुधीर फडके यांच्या आवाजातील 'आई आई ए आई' हे गाणे ऐकलेच पाहिजे असे आहे. त्यातील 'नाचते काही तरी गे अंतरी माझ्या नवे' हे द्वंद्वगीत अतिशय वेगळे आणि म्हणून वैशिष्ठ्यपूर्ण आहे. सुधीर फडके आणि आशा भोसले यांनी ते गायले आहे.

## चित्रपट - आई मला क्षमा कर

### आई आई, ए आई

आई आई, ए आई
आई आई ए आई

दोनच इवल्या अक्षरात या अमृतसिंधु भरले
आई म्हणजे जगदीशाचे प्रेमरूप अवतरले
आई इतुकी जगात महती देवाचीही नाही
आई आई ए आई , आई आई ए आई.

आईच्या अंकावर पहुडून प्यावा अमृत पान्हा
या मोहातून सुटला नाही त्रैलोक्याचा राणा
आईसाठी राम कृष्णही झाले मानवदेही
आई आई ए आई आई आई ए आई.

आई म्हणजे प्रेमरसाची अथांग गंगामाई
स्वर्गमोक्षही लोळणं घेती आई तुझिया पायी
नकोच मुक्ती कुशीत तुझिया करू दे मज अंगाई
आई आई ए आई आई आई ए आई.

## चित्रपट - आई मला क्षमा कर

### नाचते काही तरी गे अंतरी माझ्या नवे

**तो:**
नाचते काही तरी गे अंतरी माझ्या नवे
**ती:**
प्रेम त्याचे नाव, माझ्या तेच रे ह्रदया हवे, तेच रे ह्रदया हवे

**तो:**
कोठुनी येते कळेना ही सुगंधी भावना
**ती:**
भावनेच्या पूजनाने पूर्णता ये जीवना

**तो:**
वाटते प्रेमात न्हावे, प्रीतीने बेहोष व्हावे
**ती:**
मी मला विसरून जावे अन्‌ तुझ्या ह्रदयी रहावे

**तो:**
चंद्रमा गगनात येत विश्व सारे धवळते
**ती:**
प्रीत ह्रदयी प्रकट होता द्‌वैत सारे वितळते